राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सन २०१९-२० या वर्षाकरीता प्राप्त व सन २०१८-१९ मधील कमिटेड अनुदानातून ब्लडसेल, सिकलसेल तसेच हिमॅटोलॉजी कार्यक्रमांतर्गत आवश्यक किटस्, उपकरणे व औषधी साहित्य सामुग्री खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः प्रशामा-०९१९/प्र.क्र.४७४/आरोग्य-७

१० वा मजला, गो. ते. रूग्णालय संकूल इमारत,
नवीन मंत्रालय, मुंबई - ४००००१.
दिनांक : १३ सप्टेंबर, २०१९.

वाचा :-

१) सहसंचालक (तांत्रिक), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचेकडील दिनांक ११.०९.२०१९ जावक क्र.राआसो/राज्य रक्त कक्ष/ प्रशामा ५०% /५८७६१/२०१९ चे पत्र व दिनांक ०३.०९.२०१९ रोजीचे पत्र.

२) आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांच्याकडील दिनांक ०२ ऑगष्ट, २०१९ व दिनांक ०९ सप्टेंबर, २०१९ रोजीची मान्य टिप्पणी.

प्रस्तावना:-

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सन २०१९-२० या वर्षाकरीता प्राप्त व सन २०१८-१९ मधील कमिटेड अनुदानातून ब्लडसेल, सिकलसेल तसेच हिमॅटोलॉजी कार्यक्रमांतर्गत आवश्यक किटस्, उपकरणे व औषधी साहित्य सामुग्री खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

सन २०१९-२० केंद्र शासनाकडील मंजूर प्रकल्प अंमलबाजवणी आराखडयात ब्लडसेल अंतर्गत हिमॅटोलॉजी व सिकलसेल कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणी व उद्दिष्ट पुर्ततेसाठी आवश्यक असलेल्या उपकरणे, साहित्य, किटस् व औषधी इत्यादी बाबींच्या खरेदीसाठी अनुदान उपलब्ध झालेले आहे. तसेच सन २०१८-१९ मधील मंजूर झालेल्या व सन २०१९-२० करीता कमिटेड ठेवण्यात आलेल्या अनुदानातून हिमोफिलीया व थॅलेसिमीया रुग्णांच्या उपचाराकरीता आवश्यक असलेल्या औषधी खरेदी

करण्यासाठी खालील विवरणपत्रातील बाबींना पुढील अटींच्या अधिन राहून खरेदी करण्यास हाफकिन बायो फार्मासिटीकल, मुंबई यांच्या स्तरावरुन खरेदीस प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

विवरणपत्र

SR. No	F.M.R. Code	Name of Item / Medicine / Kits	Qty	Rate Inclusive All (In Rs.)	Total Amt (In Rs.)
1.	6.1.1.9.a	Blast Freezers	08	3600000.00	28000000.00
2.	6.2.7.1	Solubility Kits	24976	500.00	12488000.00
3.	6.2.7.1	Electrophoresis Kits	876	12000.00	10512000.00
		IVIG-Strength	No.of Vials		
4.	6.2.7.1	2.5% (2.5gm/100ml)	1850	3500.00	6475000.00
5.	6.2.7.1	5% (5gm/100ml)	1841	7500.00	13808000.00
7.	6.2.7.1	10% (10gm/100ml)	981	15000.00	14715000.00
8	6.2.7.2	Tab.Deferasirox,250mg	850000	7.28	6188000.00
9	6.2.7.2	Tab.Deferasirox,500mg	694500	12.32	8556240.00
10	6.2.7.2	Tab.Deferiprone,250mg	68200	4.36	297352.00
11	6.2.7.2	Tab.Deferiprone,500mg	52056	7.62	396666.72
12	6.2.7.2	Injection Desferal, 500mg	15000	150.00	2250000.00
13	6.2.7.2	Tablet Hydroxyurea, 500mg	117750	3.66	430965.00
14	6.2.7.2	Factor VII,1mg	1200	41275.50	49530600.00
15	6.2.7.2	Factor VIII PD, 250 IU	24500	1782.00	43667550.00
16	6.2.7.2	Factor VIII with VWF, 250 IU	7000	2025.00	14175000.00
17	6.2.7.2	Factor VIII Recombinant, 250 IU	63892	2509.00	160320475.00
18	6.2.7.2	Factor IX, 600 IU	6002	8694.00	52181388.00
19	6.2.7.2	APCC / FEIBA, 500 IU	3856	27615.00	106483440.00

अटी :-

१) सदर औषधी व साहित्य सामुग्रीची आवश्यकता / मागणी याची शहानिशा / खातरजमा करण्यात यावी. तातडीची बाब असल्यास आवश्यकतेनुसार काही बाबींची खरेदी हाफकिन बायो फार्मासिटीकल प्रा.लि., खरेदी कक्ष, मुंबई यांचेकडे झालेल्या निविदेतील प्राप्त न्युनतम दरावर पुर्नप्रत्ययी आदेशाद्वारे करता येईल.

२) सदरहू औषधी व साहित्य सामुग्रीचे विनिर्देश गरजेनुसार व अद्ययावत असल्याची खातरजमा करण्यात यावी. खरेदी करावयाच्या बाबींचे तांत्रिक विनिर्देश (Technical specification) संबंधित तज्ज्ञांनी (तांत्रिक समिती / अधिकारी) यांनी मान्य केलेल्या विनिर्देशानुसार असावेत. तसेच, सदर तांत्रिक विनिर्देश (Technical specification) हे कोणत्याही विशिष्ट कंपनीला फायदा होईल अशा रितीने तयार केलेले नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी. पीआयपी मध्ये मंजूर असलेल्या बाबींच्या तांत्रिक विर्निदेशानुसार मागणीपत्र पाठविण्याची जबाबदारी संबंधीत कार्यक्रम प्रमुखांची राहिल. प्रस्तावातील समाविष्ट असलेल्या बाबींचीच खरेदी करण्यात यावी.

३) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४, दिनांक १ डिसेंबर, २०१६ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारीत नियमपुस्तिका यामधील तरतूदीनुसार विहित खरेदी प्रक्रिया राबविण्यात यावी.

४) प्रशासकीय मान्यता देताना प्रस्तावित खरेदीचे दर हे अंदाजित आहेत. त्यामुळे GEM Portal, इतर राज्यांचे दरकरार, National Pharmaceutical Pricing Authority (NPPA), National Medical Devices Authority (NDMA) यांच्याकडील उपलब्ध असलेल्या न्युनत्तम दर विचारात घेण्यात यावेत. तसेच हाफकिन संस्थेतील सदर बाबींची खरेदी केली जात असल्यास अथवा झालेली असल्यास निविदेत प्राप्त झालेले न्युनत्तम दर निविदेकरीता मागणी नोंदवितांना औषधी, औषधी साहित्य व उपकरणांच्या संदर्भात अंदाजित दर म्हणून नोंदविण्यात यावेत व खरेदी प्रक्रियेअंती दर निश्चित करण्यात यावा. सदर दर हा बाजार भावापेक्षा कमी असल्याबाबत आणि संबंधित पुरवठादाराने या बाबीचा इतर ठिकाणी ज्या दराने पुरवठा केला आहे, त्या दरापेक्षा जास्त नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी.

५) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींची पुरवठापूर्व / पुरवठानंतर नमुना तपासणी (pre/Post dispatch random sample inspection) करुन उचित व योग्य विनिर्देश (specification) असलेल्या वस्तुंचीच खरेदी करण्यात येईल, याची खात्री करण्यात यावी.

६) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींचा पुरवठा झाल्यानंतर त्यांची साठवणूक व वितरण (storage & distribution) करणे तसेच, पुरवठा साखळी व्यवस्थापन (Supply chain management) आणि वस्तुसूची व्यवस्थापन (Inventory Management) योग्य पध्दतीने करुन सदर बाबी विनावापर पडून राहणार नाहीत व त्यांचा विहीत मुदतीत वापर होईल, याची दक्षता घेण्यात यावी.

७) सदरहू खरेदीसाठी होणारा खर्च हा सन २०१८-१९ मधील केंद्र शासनाकडील राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत प्रकल्प अंमलबजावणी कृती आराखडयात मंजूर झालेल्या FMR Code ६.२.७.२ रु.२८८८.०० लक्ष इतक्या अनुदानातील Commited Budget रु.१८६६.७९ लक्ष इतक्या अनुदानातून तसेच सन २०१९-२० या वर्षातील ६.१.१.९a, ६.२.७.१ या लेखाशिर्षातून उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा. तसेच खरेदी मंजुर अनुदानाच्या विहित मर्यादेतच करण्यात यावी. सदरची खरेदी प्रशासकीय मंजुरीच्या विहित कालावधीत पूर्ण होईल याची दक्षता घ्यावी.

८) तसेच, या बाबींच्या खरेदी द्विरुक्ती (Duplication) होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

९) संपूर्ण खरेदी प्रक्रिया राबविताना केंद्रिय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे (CVC Guidelines) तंतोतंत पालन करण्यात यावे.

१०) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/भाग-२/२०१३/विनियम, दिनांक १७ एप्रिल, २०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला उपविभाग-दोन मधील अ.क्र.४ नियम क्र.७ समोरील स्तंभ क्र.६ येथील अटींची पूर्तता करण्यात यावी.

११) खरेदी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर खरेदी समितीच्या मान्यतेनंतरच पुरवठा आदेश निर्गमित करण्यात यावेत.सदर प्रकरणी सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र.खरेदी - २०१६/प्र.क.२४०/आरोग्य-८ दिनांक २६ जुलै, २०१७ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात यावी.

उपरोक्त अनुक्रमांक १ ते ११ येथे नमूद अटींची पूर्तता करण्याची व खरेदी नियमानुसार व आवश्यकते प्रमाणे आहे हे सुनिश्चित करण्याची संपूर्ण जबाबदारी आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई, संचालक (आरोग्य सेवा), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई, सहसंचालक, आरोग्य सेवा (खरेदी कक्ष), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई व कार्यक्रम प्रमुख यांची राहील.

शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, भाग-२, दिनांक १७ एप्रिल, २०१५ मधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग-पहिला उपविभाग-दोन मधील अनु क्रमांक ४, नियम क्र. ७ अन्वये अवजारे, किरकोळ साधन सामग्री आणि उपक्रम संच विकत घेण्यास मंजूरी देण्यासाठी प्रशासनिक विभागास पूर्ण अधिकार प्रदान करण्यात आले आहेत त्यानुसार सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 201908131513344417 असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Varsha Munjaji Bharose

Digitally signed by Varsha Munjaji Bharose
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2f3096a175796cc670522c4aff97da20b708981b5122e87c8346c4cc7468f821, serialNumber=1bd844032884bbf2167bc99cd85325223aceef69d02bd455b7ca6972491623e0, cn=Varsha Munjaji Bharose
Date: 2019.09.13 19:43:11 +05'30'

(व. मुं. भरोसे)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
२) संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य संचालनालय, मुंबई.
३) अतिरिक्त संचालक (आरोग्य सेवा), राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे.
४) सर्व सह संचालक (आरोग्य सेवा संचालनालया मार्फत)
५) सर्व सहसचिव/उपसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग.
६) उप संचालक, सर्व मंडळ कार्यालये.
७) सर्व जिल्हा शल्य चिकित्सक (FWB मार्फत)
८) सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी (FWB मार्फत)
९) निवडनस्ती (आरोग्य-७)